भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.

दिनांक –२८/०६/२०१९.

- प्रेसनोट –

## शिरवळ भागातील खुनी हल्ल्यामधील २ महिन्यापासुन फरारी आरोपीला अटक

-----------------------------------------------------------------------------------------

दि.२८/०६/२०१९ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विष्णू पवार सो यांचे मार्गदर्शनानुसार तपास पथकातील अधिकारी पोलीस उप निरीक्षक महेंद्र पाटील हे त्यांच्या तपास पथकातील स्टाफसह कात्रज पोलीस चौकीच्या हददीमध्ये गुन्हयास प्रतिबंध होण्याच्या अनुषंगाने पेट्रोलिग करित असताना कुदंन शिंदे व सर्फराज देशमुख यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, कात्रज संतोषीमाता मदिरांच्याजवळ, शिरवळ मधील पत्रकार मुराद पटेल यांच्यावरील खुनी हल्ल्यातील पाहीजे आरोपी जावेद मुल्ला सार्वजनिक रस्त्यावर हातात कोयता घेवुन भिरकावत असुन जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना शिवीगाळ करत आहे. तसेच दुकानादारांना दुकाने बंद करुन घेण्यास सांगत आहे. मिळालेली बातमी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो यांना कळविली असता त्यांनी योग्य ति कारवाई करण्याबाबतचे आदेश दिल्याने सदर इसमास ताब्यात घेवुन त्याच्यावर भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे बेकायदेशीरपणे शस्त्र बाळल्याबाबत व सार्वजनिक ठिकाणी दहशद पसरविल्याबाबत भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५), महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७(१) सह १३५ क्रिमीनल लॉ ॲमेटमेन्ट चे कलम.७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्याकडे अधिक चौकशी करता त्याने त्याच्या इतर साथीदार याच्यासह लोकमत वर्तमान पत्राचे पत्रकार मुराद पटेल यांच्यावर कट रचुन दि.११/०४/२०१९ रोजी रात्रौ १०.३० वा सुमा. मौजे शिरवळ, ता खंडाळा, जि सातारा गावच्या हददीत शिवाजी चौक ते सटवाई कॉलनी जाणाऱ्या रोडवर मदरश्या लगत गाडी अडवुन सत्तुर आणि चाकु यांच्या सहयाने खुनी हल्ला केला होता अशी कबुली दिली आहे. त्याबाबत शिरवळ पोलीस ठाणे येथे गुरन.६१/२०१९ भादवि कलम.३०७,३४१,१२० ब,१४३,१४७,१४८,१४९ सह आर्म ॲक्ट कलम.४/२५ अन्वये गुन्हा दाखल आहे. गुन्हा दाखल झालेपासुन नमुद आरोपी हा २ महिन्यापासुन ग्रामीण पोलीसांना गुंगारा देत होता. सदर दाखल गुन्हयामध्ये यापुर्वी त्याचे दोन साथीदाराना ग्रामीण पोलीसाकडुन अटक करण्यात आली आहे.

सदर कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त पुर्वे प्रादेशिक विभाग श्री श्रींकात तरवडे, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री बच्चनसिंग सो, सहा. पोलीस आयुक्त श्री प्रिती टिपरे सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु पवार, पोलीस निरीक्षक(गुन्हे) विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री महेंद्र पाटील पोलीस कर्मचारी सचिन पवार, कृष्णा बढे, कुंदन शिदे, गणेश चिचंकर, सर्फराज देशमुख, महेश मंडलीक, राहुल तांबे, अभिजीत रत्नपारखी यांनी केलेली आहे.